## दिवाणी किर. अर्ज नं. ४०१/२०१२ मधील नि.१३० खालील आदेश

**CNR : MHSN06001409-2012**

**(रामचंद्र कदम वि लहुदास कदम आणि इतर)**

युक्तीवाद ऐकला, अभिलेखाची पाहणी केली. सदरचा दावा हा वादी यांनी जाहिर होऊन मिळणेकरीता, तथाकथित बोगस खरेदीदस्त रद्द होऊन वादीवर बंधनकारक नाही असे घोषीत होऊन मिळणेकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. वादीतर्फे सदरचा अर्ज हा अबेटमेंट संट असाईड होऊन मिळणे करीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ०१ लहुदास सखाराम कदम हे दि.२३.१०.२०२१ रोजी मालगाव, ता. मिरज, जि. सांगली येथे मयत झालेले आहेत. त्यांचे वारस ९० दिवसात अभिलेखावर आणणे आवश्यक होते. सदरचे वारस हे दि.२३.०१.२०२२ रोजी पर्यंत अभिलेखावर घेणे आवश्यक होते. वादी यांना मुदतीत वारस अभिलेखावर आणणे बाबतची माहिती नव्हती. त्यामुळे सदरचे वारस हे अभिलेखावर आणणेस वादी यांना दोन दिवसांचा विलंब झालेला आहे. तसेच दरम्यानचे कालावधीत दावा अबेट झाला असलेस अबेटमेंट सेट असाईड होऊन मिळावी. वारस रेकॉर्डवर घेणेसाठीचा स्वतंत्र अर्ज दिलेला आहे. तरी नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन सदरचा अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे. सदर कामातील प्रतिवादी क्र. ०३ हे मयत प्रतिवादी क्र. ०१ या कामी अगोदरच रेकॉर्डवर आहेत. सबब त्यांना या कामी नव्याने वारस म्हणून अभिलेखावर घेणेची जरुरी नाही अशी विनंती केली आहे.

**०२.** सदर अर्जास प्रतिवादी यांनी अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदविला. ते कथन करतात की, प्रतिवादी क्र. ०१ यांचे वारस अभिलेखावर आणणे गरजेचे होते. परंतु आणलेले नाहीत. झालेला विलंब न्यायाच्या दृष्टीने माफ करायचा झालेस खर्चाच्या रक्कमेसह मंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**०३.** दाव्याचे स्वरुप लक्षात घेता, वादीतर्फे सदरचा अर्ज हा अबेटमेंट सेट असाईड होऊन मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ०१ लहुदास सखाराम कदम यांचे वारस ९० दिवसात अभिलेखावर आणणे आवश्यक होते. परंतु वादी यांना मुदतीत वारस अभिलेखावर आणणे बाबतची माहिती नसल्यामुळे सदरचे वारस हे अभिलेखावर आणणेस वादी यांना दोन दिवसांचा विलंब झाला. प्रतिवादी क्र.०१

यांच्या वारसांना सदरचा दावा चालविण्याचे व त्यांचे म्हणणे लक्षात घेण्याची संधी देणे न्यायोचीत वाटत आहे. वादी यांनी अर्जात नमुद केलेले कारण हे पुरेशे व योग्य असल्याचे दिसून येत आहे. दाव्याचे स्वरुप नैसर्गिक न्यायतत्व लक्षात घेता, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**०१.** वादीचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

**०२.** वादी विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

सही/-
(श्रीमती एम. एस. मनगुळी)
दि.१०.०३.२०२२ दुसरे सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

Name of the Stenographer : S.P. Patil
Court : II$^{nd}$ Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj.
Date of Decision : 10/03/2022
Order signed by
the Presiding Officer on : 10/03/2022
Order uploaded on : 10/03/2022